महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र. तंशिप्र-१२२४/प्र.क्र. ०६/मुदतवाढ/२०२४/१७४६ दिनांक :- ०१/१०/२०२४

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या बी. बी. बीबीए/बीसीए/बीबीएम/बीएमएस या अभ्यासक्रमाकरीता महत्वाची सुचना

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत प्रथमच बी. बीबीए/बीसीए/बीबीएम/बीएमएस या अभ्यासक्रमाची केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. प्रसिध्द करण्यात आलेल्या वेळापत्राकानुसार प्रथम फेरीचे जागावाटप दिनांक २८/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच जागावाटप झालेल्या उमेदवारांकरीता ऑनलाईन प्रवेश निश्चित करणे व संस्थेमध्ये जाऊन प्रवेश निश्चित करण्याकरीता दिनांक २९/०९/२०२४ ते ०१/१०/२०२४ पर्यंत कालावधी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता.

सदर प्रक्रियेदरम्यान या कार्यालयाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, काही संस्थांमध्ये जागावाटप झालेले असून परंतु उमेदवारांनी संस्थेत जाऊन प्रवेश निश्चित केलेले नाही. अशा उमेदवारांच्या शैक्षणिक हिताचा विचार करुन दिनांक ०३/१०/२०२४ रोजी पर्यंत प्रथम फेरीकरीता ऑनलाईन प्रवेश निश्चित करणे व संस्थेमध्ये जाऊन प्रवेश निश्चित करण्याकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच ज्या संस्थांनी अद्याप प्रवेश निश्चित केलेले नाही अशा सर्व संस्थांनी वाढवून देण्यात आलेल्या मुदतीत सदर प्रवेश निश्चित करण्यात यावे. त्याअनुषंगाने बी. बीबीए/बीसीए/बीबीएम/बीएमएस या अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे सुधारीत वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून याची सर्व उमेदवार,पालक व संस्थांनी नोंद घ्यावी.

**टिप :- दिनांक ०२/१०/२०२४ रोजी महात्मा गांधी जयंती असल्यामुळे संबंधित अभ्याक्रमाची प्रवेश प्रक्रिया बंद ठेवण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी उमेदवार, पालक व संस्थांनी www.mahacet.org यासंकेतस्थळावर भेट द्यावी.**

सही/-
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई